

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकीटे लावून पोस्टाने पाठविण्याचा परवाना – Regd. NSK / 231 / 2015-2017
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरीत केला जातो.

**किंमत १ रुपया**

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ३६ वे | अंक १ ला | १० जानेवारी २०१५

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

## ● ८१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ●

दि. १ / १ / २०१५

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. २६ जानेवारी २०१५ रोजी नभांगण लॉन्स, गजानन महाराज मंदिरासमोर, वनवैभव, वडाळा पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक येथे सकाळी १०.३० वाजता आयोजित केली आहे.

**– सभेपुढील विषय –**

१) दि. २६–१–२०१४ रोजी झालेल्या ८० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०१३ – २०१४ या सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.
३) सन २०१३ – २०१४ या सालच्या आय–व्यय व आढावा पत्रके व ऑडिट रिपोर्टची नोंद (आर्थिक) घेणे.
४) सन २०१५ – २०१६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०१४–२०१५ ह्या सालासाठी सरकारमान्य हिशोब तपासणीसाची नियुक्ती.
६) सभेपुढे मुदतीत आलेल्या सूचनांवर विचार करणे.

**श्री. अभय खरे**
कार्यवाह

---

**सूचना –**

१) काही सूचना / प्रश्न असल्यास २०/१/२०१५ पर्यंत कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात संघाच्या कार्यालयात आणून द्याव्यात.
२) मुदतीनंतर किंवा आयत्यावेळी आलेल्या सूचनांचा विचार होणार नाही, याची सभासदांनी नोंद घ्यावी.
३) गणसंख्येअभावी सभा स्थगित करावी लागल्यास, ती त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरू होईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
४) हिशोबपत्रके कार्यालयात ठेवलेली आहेत.

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# ८१ वा वार्षिक अहवाल

### वर्ष २०१३-२०१४

**सभासद संख्या** :

अहवाल वर्षात २६ नवीन सभासद झाले असून संस्थेची एकूण सभासद संख्या २३०५ झाली आहे.

**देणगीदार** :

ह्या आर्थिक वर्षात एकूण रु. ८,३३,३९३/- च्या देणग्या संस्थेस प्राप्त झाल्या आहे. त्यात प्रामुख्याने सौ. माधुरी केळकर २५०००/- (प्रोजेक्टर), श्री. जयंत जोगळेकर ११,०००/-, श्री. सुरेश दाबक ५०००/-, श्रीमती माधुरी पेंडसे ५०००/-, श्री. मुकुंद खाडिलकर ५०००/-, श्री. अच्युत घैसास २०००/-, श्रीमती विजया भागवत २०००/- इत्यादी अनेक दानशूर सभासदांनी देणग्या दिल्या. सर्व सन्माननीय देणगीदारांचा उल्लेख या ठिकाणी शक्य नसल्याबद्दल क्षमस्व. तसेच देणगीदारांचे संस्थेच्या वतीने कृतज्ञता पूर्वक आभार.

**श्री परशुराम जयंती** :

१२ मे २०१३ रोजी परशुराम जयंती उत्साहात व भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. परशुराम जयंती आणि अक्षय तृतीयेचे औचित्य साधून या दिवशी वेदविद्येचे अध्ययन व अध्यापन करणे आणि आपल्या प्राचीन संस्कृतीचा ठेवा वृद्धिंगत करण्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणाऱ्या वेदमूर्तींचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. प्रा. यशवंत पाठक ह्यांच्या हस्ते वेदमूर्ती समोहन वामन कोल्हटकर (ऋग्वेद) वेदमूर्ती यशवंत भास्कर पैठणे (यजुर्वेद), वेदमूर्ती (सोमयाजी), चैतन्य नारायण काळे (सामवेद) आणि वेदमूर्ती किरण अरुणराव गोसावी (अथर्ववेद) अशा चारही वेदातील वेदमूर्तींचा करण्यात आला. वेदमूर्तींना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, भेटवस्तू, श्री परशुरामाची प्रतिमा, मानपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. वेदमूर्तींना जे मानपत्र देण्यात आले त्याचे वाचन सौ. मंगला जोगळेकर यांनी केले. त्याचबरोबर अन्य क्षेत्रात यशदायी कार्य करणाऱ्या खालील तीन महिलांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. सौ. अनिता गोगटे - Best Professor Innovative Teaching (by Pune University) कु. प्रज्ञा गद्रे - आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकन प्राप्त बॅडमिंटनपटु - कु. सुखदा बेहेरे NCRT ही अभिजात संगातातील पदवी प्राप्त. गुणवंत-यशवंत व्यक्तिंचा सत्कार करावयाचा असताना ज्यांच्या शुभहस्ते व्हावा ती व्यक्ति देखील श्रेष्ठ असावी अशी रास्त अपेक्षा असते. ह्या प्रसंगी आपल्याला लाभलेले प्रमुख पाहुणे प्रा. श्री. यशवंत पाठक हे संत काव्याचे गाढे अभ्यासक आहेत. त्यांच्या भाषणाने कार्यक्रमाला एका उंचीवर नेले. स्पष्ट शब्दोच्चार, ओघवती शुद्ध रसाळ भाषा व उत्तम वक्तृत्व कौशल्य यामुळे त्यांच्या भाषणाने उपस्थित मंत्रमुग्ध झाले.

या कार्यक्रमाच्या जोडीला - ज्येष्ठ संस्था सदस्यांचा अमृत महोत्सवी सत्कार (वयाची ७५ वर्षे पुर्ण केलेल्या) यावेळी करण्यात आला. अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात चांगले कार्य केलेले, अनुभवी, आयुष्याचे चढ आणि उतार पाहिलेले असे सर्व ज्येष्ठ कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांचा शाल-श्रीफळ, पुष्पगुच्छ व गौरवपत्र देऊन सत्कार करण्यात आला. हा कौतुक सोहळा पाहण्यासाठी त्यांचे नातेवाईक, मुले, नातवंडे मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराचे निवेदन श्री. नितीन सहस्त्रबुद्धे व श्री. शेखर रानडे यांनी केले. या समारंभात सर्व सत्कारार्थी वेदमूर्तींनी वेदातील काही ऋचा म्हणल्याने सभागृहात पवित्र वातावरण तयार

झाले व वेदमूर्तींच्या अथक साधनेची प्रचितीच आली. सौ. मैथिली गोखले यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत सूत्र संचलन केले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. श्रीरंग वैशंपायन यांनी सर्वांचे आभार मानले.

### सामुदायिक व्रतबंध :

परशुराम जयंतीनंतर दुसरे दिवशी अक्षय तृतीयेस (१३ मे २०१३) संस्थेच्या वतीने सामुदायिक व्रतबंध सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री. विनायक साने गुरुजी व त्यांचे सहकारी यांनी उत्तम प्रकारे केले. संस्थेतर्फे श्री. श्रीरंग वैशंपायन, सौ. मंगला जोगळेकर आणि श्री. अनिरुद्ध अभ्यंकर यांनी बटुंना आशिर्वाद व भेट वस्तू दिल्या. कार्यक्रमास बटूंचे कुटुंबीय आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजक मंच ५ वा वर्धापन दिन :

नाशिक चित्तपावन उद्योजक मंच चा पाचवा वर्धापन दिन १८ ऑगस्ट २०१३ रोजी शंकराचार्य न्यासाच्या सभागृहात मोठ्या दिमाखात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने, श्री. हर्षा भोगले, श्री. भाऊ साठे यांनी दीप प्रज्वलन करून केली. श्री. विजय साने यांनी संस्था करीत असलेल्या कार्याची माहिती दिली. उद्योजक मंचाची माहिती श्री. देवेंद्र बापट यांनी करून दिली. उद्योजकीय मानसिकता वाढीस लागण्यासाठी, व्यवसाय वाढीसाठी एकत्र यावे या उद्देशाने उद्योजक मंचाची स्थापना केल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी यापासून स्फूर्ती घेऊन मंच स्थापन झाल्याची माहिती त्यांनी दिली. याच कार्यक्रमात श्री. विनायक रानडे यांचा त्यांच्या – 'ग्रंथ तुमच्या दारी' या नाविन्यपूर्ण चळवळीच्या यशस्वीतेबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रम एकूण चार सत्रात झाला. महाराष्ट्राबाहेर व्यवसाय करणारे बेळगांवचे श्री. कार्लेकर, हैद्राबादचे श्री. पटवर्धन, चेन्नईचे श्री. आशुतोष आपटे यांनी महाराष्ट्राबाहेरच्या प्रांतात असूनही 'मराठी' असल्याची कोणतीही अडचण आम्हास आली नाही हे आवर्जून सांगितले. दुसऱ्या सत्रात श्री. सुनिल बर्वे, श्री. विष्णू मनोहर आणि श्री. भाऊ साठे यांच्या मुलाखती झाल्या. आपली कला आणि व्यवसाय याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. तिसऱ्या सत्रात – मौज प्रकाशनचे श्री. भागवत, साहिल ग्रुपचे श्री. विनय फडणीस व निराडा पेंटस्चे श्री. चक्रदेव यांनी भाग घेतला. या तिघांनीही आपल्या व्यवसायात सर्वोत्तम तेच देणार हे तत्व अंगिकारल्याने आज या पायरीवर पोहोचल्याचे आवर्जून सांगितले. चौथे आणि शेवटचे सत्र श्री. हर्षा भोगले यांनी आपल्या उत्स्फूर्त भाषणाने गाजविले. मी शिकलो ते सारे क्रिकेटमधून असे सांगून त्यांनी क्रिकेटच्या ११ खेळाडू प्रमाणे अकरा मुद्यांमधून प्रत्येक घटनेकडे कसे पहावे म्हणजे त्याचा योग्य परिणाम होऊ शकतो याचे फार मार्मिक विवेचन केले.

दरवर्षीप्रमाणे श्री. सुधीर गाडगीळ व श्री. सुधीर जोगळेकर यांनी मान्यवरांना समर्पक प्रश्न विचारून बोलते करून कार्यक्रम रंगतदार केला.

कार्यक्रमाची सांगतात धनलक्ष्मी पटवर्धन यांच्या वंदे मातरम् ने झाली. सूत्रसंचलन तृप्ती साठ्ये आणि दिपाली पटवर्धन यांनी केले.

### गणेशोत्सव :

सालाबादप्रमाणे या वर्षी दि. ८/९/२०१३ ते १५/९/२०१३ दरम्यान उत्साहात व मंगलमय वातावरणात गणोशोत्सव साजरा करण्यात आला. प्रथम हरितालिका पूजन सौ. मंगला जोगळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. कार्यवाह श्री. अभय खरे यांच्या हस्ते श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. याप्रसंगी सामुदायिक अथर्वशीर्ष पठणही करण्यात आले. संस्थेचा वर्धापन दिन सोहळा साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे ख्यातनाम चार्टर्ड अकौन्टंट श्री. प्रकाश पाठक यांच्या हस्ते दहावी, बारावी, पदवी, पदविका परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींचा पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला.

## शारदीय नवरात्र उत्सव :

शारदीय नवरात्रोत्सव दरवर्षीप्रमाणे दि. ११/१०/२०१३ रोजी काका गद्रे मंगल कार्यालयात अष्टमीस 'श्री महालक्ष्मी उत्सव' आनंदात पार पडला. सकाळी १०.३० वा. देवीची पंचामृती पूजा करण्यात आली. पुजेसाठी सुमारे ४० भगिनी उपस्थित होत्या. सौ. आसावरी सहस्त्रबुद्धे यांनी पूजा सांगितली. मंत्रोच्चारांसह अनेक उपचारांचा कार्यकारणभाव देखील सांगितला. त्यानंतर महालक्ष्मीच्या आरतीचे व कहाणीचे वाचन करण्यात आले. महालक्ष्मी देवीच्या प्रसादाचा लाभ जमलेल्या अनेक महिलांनी घेतला.

संध्याकाळी महालक्ष्मी देवीचा मुखवटा तयार करण्याचे काम सौ. संध्या केळकर यांनी केले. देवीचे रूप अत्यंत सात्विक व प्रसन्न असे दिसत होते. ह्यावेळी नाशिक शहरातील शेकडो सदस्य व भक्तांनी देवीचे दर्शन घेतले. सप्तशतीचा पाठ, देवीची गाणी, आरत्या म्हणणाऱ्यांचा सुरेल आवाज त्यामुळे वातावरण मंगलमय झाले होते.

अष्टमीच्या दिवशी नेहमीप्रमाणे तळमजल्यावर सदस्य महिलांनी विविध वस्तूचे स्टॉल्स मांडले होते. त्यामध्ये कपडे, शोभिवंत वस्तू, फराळाचे पदार्थ, शैक्षणिक खेळणी, पर्स, पिशव्या, अनेक गृहोपयोगी वस्तू विक्रीसाठी उपलब्ध होत्या. त्याचा सर्वांनी लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौ. रेखा फडके, सौ. मंगला जोगळेकर, सौ. ऐश्वर्या साने, सौ. गोखले, सौ. अमृता वाड, सौ. वासंती फडके, सौ. माधवी जोगळेकर, सौ. अदिती आघारकर व अन्य सदस्य महिलांनी सहकार्य केले. तसेच कार्यकारिणी सदस्य, पदाधिकारी, युवा मंचचे कार्यकर्ते, सेवकवर्ग ह्या सर्वांनी उपक्रमासाठी मदत केली.

## कोजागिरी :-

मागच्या वर्षी प्रमाणेच याही वर्षी कोजागिरी हा कार्यक्रम नाशिकरोड येथे शिखरेवाडी मधील ताराराणी हॉलच्या प्रांगणात शनिवार दि. २६/१०/२०१३ रोजी झाला. त्यावेळी श्री. विवेक केळकर यांचा 'चंद्र आहे साक्षीला' हा गायनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास नाशिकरोड परिसरातील सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते. या कोजागिरी पौर्णिमा उत्सवानिमित्त अर्थातच दुग्धपान आणि सुस्वाद भोजनाचा लाभही उपस्थितांनी घेतला. नाशिकरोड येथील सर्वच सदस्यांचा यात सहभाग होता.

## लक्ष्मीपूजन :

सालाबादप्रमाणे श्री परशुराम सहकारी पतसंस्था व चित्तपावन ब्राह्मण संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीत लक्ष्मीपूजन आयोजित करण्यात आले. श्री. व सौ. नितीन सहस्त्रबुद्धे यांच्या शुभ हस्ते लक्ष्मीपूजन व वहीपूजन करण्यात आले. पौरोहित्य श्री. साने गुरुजींनी केले. या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त. डॉ. काकतकर, प्रा. दिलीप फडके, प्रा. दिनकरराव बर्वे, अध्यक्ष श्री. विजय साने, श्री. दामले, श्री. खरे, श्री. रानडे आणि मान्यवर सभासद उपस्थित होते.

## महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा) :

संस्थेच्या सदस्य महिलांनी एकत्र येऊन महिला मंडळ सुरू केले. दर महिन्यास या सर्व मैत्रिणी जमतात. वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करतात. व्याख्याने, स्पर्धा घेऊन ह्या द्वारे कला, आरोग्य, समाजोपयोगी कार्याच्या माहितीची देवाण-घेवाण करतात. यास एक वर्ष पूर्ण झाले. या निमित्त चित्तपावन महिला मंडळाचा 'प्रथम वर्धापन दिन' सोहळा २३ नोव्हेंबर २०१४ रोजी सायंकाळी ५ वा. काका गद्रे मंगल कार्यालयात संपन्न झाला. ह्या कार्यक्रमास संस्था अध्यक्ष श्री. विजय साने यांनी शुभेच्छा दिल्या व आपले मनोगत व्यक्त केले. अनेक जुन्या नव्या नाटकातून व दूरदर्शनवर विविध वाहिन्यांमधील मालिकांमधून व सिनेमात काम केलेल्या सौ. विद्या करंजीकर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांची मुलाखत सौ.

मैथिली गोखले यांनी घेतली. विद्याताईंनी नाटकाच्या तालिमींदरम्यानचे व इतरही अनुभव, गमती-जमती सांगितल्या. प्रश्नोत्तरे झाली. त्यामुळे प्रेक्षकांचे मनोरंजन झाले. ह्या प्रसंगी 'घरकुल' या संस्थेच्या संचालिका विद्याताई फडके यांचा समाज कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. घरकुल या संस्थेतील मंदबुद्धी विद्यार्थिनींना या मुलींना आपल्याप्रमाणेच बोलायला, तुमच्या आमच्यामध्ये मिसळायला, आनंद घ्यायला आवडते. त्या मुलींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेच ध्येय विद्याताईंनी ठेवले आहे. सौ. अमृता वाड यांनी सौ. विद्या करंजीकर यांचा व सौ. ऐश्वर्या साने यांनी सौ. विद्या फडके यांचा परिचय करून दिला. दोन्ही प्रमुख अतिथींचा शाल, श्रीफळ, भेटवस्तू, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ. वासंती फाळके यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. मंगला जोगळेकर यांनी केले.

**कै. काकासाहेब गद्रे पुण्यतिथी निमित्त हरिपाठ व किर्तनाचा कार्यक्रम** दि. २४ जानेवारी २०१४ रोजी गद्रे मंगल कार्यालयात संपन्न झाला. महामुनी अगस्ती महाराज रामेश्वर दिंडी पाटोदा तर्फे हरिपाठ व भजने तसेच ह.भ.प. सुशिलाताई कामत, ह.भ.प. बाळासाहेब वाक्चौरे ह्यांचे किर्तन भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाले. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घेतला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने, कार्यवाह श्री. अभय खरे, श्री. सुधीर दामले, श्री. चंद्रशेखर रानडे, श्री. नितीन सहस्त्रबुद्धे, श्री. अनिरुद्ध अभ्यंकर तसेच भाविक उपस्थित होते. सुमारे १५० हून अधिक वारकरी बांधवांनी भजन, किर्तन, हरिपाठ व प्रसादाचा लाभ घेतला.

### धुंधुर्मास :

संस्थेतर्फे धुंधुर्मास कार्यक्रम २६ जानेवारी २०१४ रोजी नभांगण लॉन्स, गजानन महाराज मंदिरासमोर, वडाळा पाथर्डी रोड, इंदिरानगर येथे अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणामध्ये संपन्न झाला. विशेष म्हणजे त्याचठिकाणी आधी सकाळी १० वा. संस्थेची ८० वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि विशेष सर्वसाधारण सभा ११ वा. संपन्न झाली. सुमारे ४५० हून अधिक सदस्य व कुटुंबियांनी यात सहभाग घेतला.

कार्यक्रमास - संस्थेचे विश्वस्त, अध्यक्ष आणि सर्व पदाधिकारी, कर्मचारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आर्थिक व इतर मदत :

संस्थेच्या विविध योजनांअंतर्गत गंभीर स्वरुपाच्या आजारासाठी वैद्यकीय इलाजासाठी, तसेच शिक्षणासाठी हुशार होतकरू विद्यार्थ्यांसाठी व गरजुंसाठी शिधा-वाटप योजनेअंतर्गत मदत करण्यात येते. ह्या आर्थिक वर्षात शैक्षणिक मदत सुमारे एक लाख, वैद्यकीय मदत तर शिधा वाटप योजनेअंतर्गत सुमारे एक लाखाहून अधिक अशी मदत करण्यात आली.

### श्रद्धांजली :

या अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना आणि सभासदांच्या कुटुंबियातील सदस्याप्रती या ठिकाणी विनम्र श्रद्धांजली.

### आभार :

श्री भगवान परशुराम आणि ज्येष्ठांच्या आशिर्वादाने तसेच विश्वस्त व ज्येष्ठ सभासदांच्या मार्गदर्शनाने ही यशस्वी वाटचाल अशीच पुढे निरंतर चालू राहो. कार्यकारी मंडळ, सर्व सहकारी, समर्पित सेवकवृंद यांचे सहकार्य सतत लाभते आहेच. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. भविष्यातही अशीच साथ लाभो ज्याद्वारे संस्थेचा, ज्ञातीबांधवांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो हीच श्री परशुराम चरणी प्रार्थना.

धन्यवाद !

**- अभय खरे,** कार्यवाह

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

एकत्रित तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| जमा | परि.क्र. | रू. | नांवे | परि.क्र. | रू. |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | १ | ३,८२,७१२.०१ | मालमत्तेवरील खर्च | ६ | ५,५१,२३२.०० |
| देणगी व वर्गणी | २ | ८,९१,८८५.०० | व्यवस्थापकीय खर्च | ७ | ४,२७,४९१.९१ |
| कार्यालय उत्पन्न | ३ | १८,९७,७८३.०० | कार्यालय खर्च | ८ | ४६,९५६.९२ |
| इतर जमा | ४ | ४,२२,७८४.०० | उद्देशावर आलेला खर्च | ९ | ८,७३,११३.०० |
| अनामत | ५ | ९२,७५१.०० | | | |
| निधी | १२ | २६,०२६.०० | अनामत / इतर खर्च | १० | ५,१५,०५१.०० |
| कर्ज | १३ | ९,७५,०००.०० | मालमत्ता / गुंतवणुक | १४ | ४४,७२,०५४.०० |
| मालमत्ता | १५ | ८५,७२१.०० | अखेर शिल्लक | ११ | ११,६७,९६४.१८ |
| इतर देणे | १६ | ३२,७९,२०१.०० | | | |
| | | **८०,५३,८६३.०१** | | | **८०,५३,८६३.०१** |

अहवालास अनुसरून

| सनदी लेखापाल<br>(भालचंद्र द. कर्वे)<br>नाशिक. दि. ०८/१२/२०१४ | **श्री.विजय साने**<br>अध्यक्ष | **श्री. श्रीरंग वैशंपायन**<br>कोषाध्यक्ष | **श्री. अभय खरे**<br>कार्यवाह |
|---|---|---|---|

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

एकत्रित आयव्यय पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| उत्पन्न | परि.क्र. | रू. | खर्च | परि.क्र. | रू. |
|---|---|---|---|---|---|
| देणगी व वर्गणी | २ | ८,९१,८८५.०० | मालमत्तेसंबंधी खर्च | ६ | ५,५१,२३२.०० |
| कार्यालय उत्पन्न | ३ | १८,९७,७८३.०० | व्यवस्थापकीय खर्च | ७ | ४,२७,४९१.९१ |
| इतर जमा | ४ | ४,२२,७८४.०० | घसारा | | ५,८०,५६९.६६ |
| | | | उद्देशावर आलेला खर्च | ९ | ८,७३,११३.०० |
| | | | कार्यालय खर्च | ८ | ४६,९५६.९२ |
| | | | निव्वळ वाढ | | ७,३३,०८८.५१ |
| | | **३२,१२,४५२.००** | | | **३२,१२,४५२.००** |

अहवालास अनुसरून

| सनदी लेखापाल<br>(भालचंद्र द. कर्वे)<br>नाशिक. दि. ०८/१२/२०१४ | **श्री.विजय साने**<br>अध्यक्ष | **श्री. श्रीरंग वैशंपायन**<br>कोषाध्यक्ष | **श्री. अभय खरे**<br>कार्यवाह |
|---|---|---|---|

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

एकत्रित आढावा पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| निधी व जोखीम | परि क्र. | रु. | रु. |
|---|---|---|---|
| **विश्वस्त निधी** | ५ | | २९,०४,०३६.१० |
| **अनामत** | ६ | | ४,५३,४९३.७४ |
| इतर देणे | ७ | | ५४,११,६४२.५० |
| **उत्पन्न व खर्च यातील वाढ** | | | |
| मागील बाकी | | २८,७९,७५१.०५ | |
| (–) चालू वर्षातील घट | | ७,३३,०८८.५२ | ३६,१२,८३९.५७ |
| **एकूण** | | | **१,२३,८२,०११.९१** |

अहवालास अनुसरून

| सनदी लेखापाल<br>(भालचंद्र द. कर्वे)<br>नाशिक. दि. ०८/१२/२०१४ | **श्री.विजय साने**<br>अध्यक्ष | **श्री. श्रीरंग वैशंपायन**<br>कोषाध्यक्ष | **श्री. अभय खरे**<br>कार्यवाह |
|---|---|---|---|

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

एकत्रित आढावा पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| जिंदगी व येणे | परि क्र. | रु. | रु. |
|---|---|---|---|
| **स्थावर मालमत्ता**<br>(मालमत्ता पत्रकाप्रमाणे) | १ | | ७२,०३,३६९.७३ |
| **गुंतवणूक** | ३ | | ३९,००,५००.०० |
| **(डिपॉझिट व ॲडव्हान्सेस) ठेवी व कर्जे** | २ | | २३,७३०.०० |
| **इतर येणे** | ४ | | ८६,४४८.०० |
| **अखेर शिल्लक** | | | |
| गद्रे कार्यालय | | १२,१६६.०० | |
| परशुराम नागरी सहकारी पतसंस्था | | ५५,३३९.०० | |
| सारस्वत बँक – गद्रे कार्यालय | | ३७,१४९.४७ | |
| नामको बँक – चित्तपावन | | २३,७८८.४० | |
| कॉसमॉस बँक | | ५२,९५०.३१ | |
| स्टेट बँक ऑफ इंडिया – प्रशासकीय | | ९,८६,५७१.०० | ११,६७,९६४.१८ |
| **एकूण** | | | **१,२३,८२,०११.९१** |

अहवालास अनुसरून

सनदी लेखापाल
(भालचंद्र द. कर्वे)
नाशिक. दि. ०८/१२/२०१४

**श्री.विजय साने**
अध्यक्ष

**श्री. श्रीरंग वैशंपायन**
कोषाध्यक्ष

**श्री. अभय खरे**
कार्यवाह

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| जमा | गद्रे मंगल कार्यालय<br>रु. | चित्तपावन मंगल कार्यालय<br>रु. | एकूण<br>रु. |
|---|---|---|---|
| परिशिष्ट–१ | | | |
| **आरंभीची शिल्लक** | | | |
| रोख | ३३६.३७ | -- | ३३६.३७ |
| परशुराम नागरी सहकारी संस्था | ५३,१९०.०० | -- | ५३,१९०.०० |
| सारस्वत बँक | ४०,९७२.३९ | -- | ४०,९७२.३९ |
| कॉसमॉस बँक | २,५४,७७५.८५ | | २,५४,७७५.८५ |
| नामको बँक | -- | २२,८६७.४० | २२,८६७.४० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | -- | १०,५७०.०० | १०,५७०.०० |
| | ३,४९,२७४.६१ | ३३,४३७.४० | ३,८२,७१२.०१ |
| परिशिष्ट–२ | | | |
| **देणगी व वर्गणी** | | | |
| देणगी | ८,३३,३९३.०० | १,००१.०० | ८,३४,३९४.०० |
| शैक्षणिक निधी | ५७,४९१.०० | -- | ५७,४९१.०० |
| | ८,९०,८८४.०० | १,००१.०० | ८,९१,८८५.०० |
| परिशिष्ट–३ | | | |
| **कार्यालय उत्पन्न** | | | |
| कार्यालय भाडे | ४,७३,३४१.०० | -- | ४,७३,३४१.०० |
| परशुराम नागरी सहकारी पत. मर्या. | ८०,१००.०० | -- | ८०,१००.०० |
| परशुराम भाडे | ८,९९,३४२.०० | -- | ८,९९,३४२.०० |
| चित्तपावन भाडे | -- | ४,४५,०००.०० | ४,४५,०००.०० |
| | १४,५२,७८३.०० | ४,४५,०००.०० | १८,९७,७८३.०० |
| परिशिष्ट–४ | | | |
| **इतर जमा** | | | |
| बँक व्याज | ३,६०७.०० | ९२१.०० | ४,५२८.०० |
| मुदत ठेवीवरील व्याज | ३,१५,२७८.०० | -- | ३,१५,२७८.०० |
| वधू–वर सूचक मंडळ | २१,७१७.०० | -- | २१,७१७.०० |
| जाहिरात | १४,९०७.०० | -- | १४,९०७.०० |
| इतर जमा | ३१,४९३.०० | -- | ३१,४९३.०० |
| विद्युत सुविधा | ३४,८६१.०० | -- | ३४,८६१.०० |
| | ४,२१,८६३.०० | ९२१.०० | ४,२२,७८४.०० |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| जमा | गद्रे मंगल कार्यालय रु. | चित्तपावन मंगल कार्यालय रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| परिशिष्ट–५ | | | |
| **अनामत** | | | |
| कार्यालय अनामत | ७७,३२६.०० | -- | ७७,३२६.०० |
| परशुराम भवन अनामत | ३,०००.०० | -- | ३,०००.०० |
| टेलिफोन अनामत | ७,६५०.०० | -- | ७,६५०.०० |
| वीज अनामत | -- | ४,७७५.०० | ४,७७५.०० |
| | ८७,९७६.०० | ४,७७५.०० | ९२,७५१.०० |
| **निधी** | | | |
| सभासद वर्गणी | २६,०२६.०० | -- | २६,०२६.०० |
| | २६,०२६.०० | -- | २६,०२६.०० |
| **मालमत्ता** | | | |
| पुस्तके | ८५,७२१.०० | -- | ८५,७२१.०० |
| | ८५,७२१.०० | -- | ८५,७२१.०० |
| **कर्ज** | | | |
| अदिती जोशी | | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| अ. अभ्यंकर | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| भालचंद्र कर्वे (एच यु एफ) | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| देवदत्त जोशी | | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| देवेंद्र बापट | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| जगदीश फडके | | २५,०००.०० | २५,०००.०० |
| जयवंत जोगळेकर | | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| केतन पटवर्धन | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| मैथिली गोखले | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| नितीन सहस्त्रबुद्धे | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| प्रभाकर केळकर | | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| श्रीकृष्ण विद्वांस | | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| वसंत दातार | | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| यशवंत केळकर | | १,००,०००.०० | १,००,०००.०० |
| | -- | ९,७५,०००.०० | ९,७५,०००.०० |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| जमा | गद्रे मंगल कार्यालय रु. | चित्तपावन मंगल कार्यालय रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| **इतर देणे** | | | |
| मुदत ठेव | २७,००,०००.०० | २,००,०००.०० | २९,००,०००.०० |
| मीरा एन्टरप्राईजेस | १,१५,३७६.०० | -- | १,१५,३७६.०० |
| हिरामण चिंधा देवरे | २,०००.०० | -- | २,०००.०० |
| टीडीएस | ६,०८५.०० | -- | ६,०८५.०० |
| सेवा कर | २,५३,०४०.०० | -- | २,५३,०४०.०० |
| चित्तपावन चरित्र कोष | २,७००.०० | -- | २,७००.०० |
| | ३०,७९,२०१.०० | २,००,०००.०० | ३२,७९,२०१.०० |
| चित्तपावन ब्राह्मण संघ | ७,०४,७७५.०० | ९६,०५३.०० | ८,००,८२८.०० |
| **एकूण** | **७०,९८,५०३.६१** | **१७,५६,१८७.४०** | **८८,५४,६९१.०१** |

| **श्री.विजय साने** | **श्री. श्रीरंग वैशंपायन** | **श्री. अभय खरे** |
|---|---|---|
| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| खर्च | गद्रे मंगल कार्यालय रु. | चित्तपावन मंगल कार्यालय रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| परिशिष्ट–६ | | | |
| **मालमत्तेवरील खर्च** | | | |
| मनपा व इतर कर | १,०६,६५४.०० | ४१,०५३.०० | १,४७,७०७.०० |
| वीज खर्च | ५९,९४५.०० | -- | ५९,९४५.०० |
| पाणी सुविधा | ३७,६२३.०० | -- | ३७,६२३.०० |
| दुरूस्ती खर्च | ३,०५,९५७.०० | -- | ३,०५,९५७.०० |
| | ५,१०,१७९.०० | ४१,०५३.०० | ५,५१,२३२.०० |
| परिशिष्ट–७ | | | |
| **व्यवस्थापकीय खर्च** | | | |
| पगार व मानधन | १,९२,८००.०० | -- | १,९२,८००.०० |
| देणगी | १८,५०१.०० | -- | १८,५०१.०० |
| टेलिफोन | १३,३९६.०० | -- | १३,३९६.०० |
| हिशेब तपासणी फी | १२,०००.०० | -- | १२,०००.०० |
| वेब साईट खर्च | १६,८००.०० | -- | १६,८००.०० |
| हिशेब लिहिणावळ | ४,०००.०० | -- | ४,०००.०० |
| टीडीएस फी | ६३०.०० | -- | ६३०.०० |
| टीडीएस व्याज | १,६०८.०० | -- | १,६०८.०० |
| सेवा कर | ४,७१४.०० | -- | ४,७१४.०० |
| सेवा कर व्याज | ५,१००.०० | -- | ५,१००.०० |
| सभा खर्च | २०,७२०.०० | -- | २०,७२०.०० |
| टपाल खर्च | ११,९०१.०० | -- | ११,९०१.०० |
| बँक कमिशन (चार्जेस) | १,२०८.९१ | -- | १,२०८.९१ |
| छपाई | १,२४,११३.०० | -- | १,२४,११३.०० |
| | ४,२७,४९१.९१ | -- | ४,२७,४९१.९१ |
| परिशिष्ट–८ | | | |
| **कार्यालय खर्च** | | | |
| लॉकर भाडे | ७,३०२.९२ | -- | ७,३०२.९२ |
| कार्यालयीन खर्च | ३,७४२.०० | -- | ३,७४२.०० |
| साफसफाई, धुलाई | १८,५७९.०० | -- | १८,५७९.०० |
| प्रवास खर्च | ५,४३१.०० | -- | ५,४३१.०० |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| खर्च | गद्रे मंगल कार्यालय रु. | चित्तपावन मंगल कार्यालय रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| किरकोळ खर्च | ३,९३७.०० | -- | ३,९३७.०० |
| विमा खर्च | ७,९६५.०० | -- | ७,९६५.०० |
| | ४६,९५६.९२ | -- | ४६,९५६.९२ |
| परिशिष्ट–९ | | | |
| **उद्देशावर आलेला खर्च** | | | |
| वैद्यकीय, इतर आर्थिक मदत | १,२४,४५०.०० | -- | १,२४,४५०.०० |
| उत्सव सत्कार समारंभ | ४,९५,९७५.०० | -- | ४,९५,९७५.०० |
| शैक्षणिक मदत | २,५२,६८८.०० | -- | २,५२,६८८.०० |
| | ८,७३,११३.०० | -- | ८,७३,११३.०० |
| परिशिष्ट–१० | | | |
| **अनामत / इतर खर्च** | | | |
| सेवा कर | २,४१,३२४.०० | -- | २,४१,३२४.०० |
| टीडीएस | ४,०३७.०० | -- | ४,०३७.०० |
| कार्यालय अनामत | १,३२,३२६.०० | -- | १,३२,३२६.०० |
| वीज अनामत | १४,९४०.०० | -- | १४,९४०.०० |
| मीरा एन्टरप्राईजेस | १,१७,४२४.०० | -- | १,१७,४२४.०० |
| हिरामण देवरे | ५,०००.०० | -- | ५,०००.०० |
| | ५,१५,०५१.०० | -- | ५,१५,०५१.०० |
| परिशिष्ट–११ | | | |
| **अखेर शिल्लक** | | | |
| रोख | १२,१६६.०० | -- | १२,१६६.०० |
| सारस्वत बँक | ३७,१४९.४७ | -- | ३७,१४९.४७ |
| नामको बँक | -- | २३,७८८.४० | २३,७८८.४० |
| पी एन एस पी एस (पतसंस्था) | ५५,३३९.०० | -- | ५५,३३९.०० |
| कॉसमॉस बँक | ५२,९५०.३१ | -- | ५२,९५०.३१ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | -- | ९,८६,५७१.०० | ९,८६,५७१.०० |
| | १,५७,६०४.७८ | १०,१०,३५९.४० | ११,६७,९६४.१८ |
| परिशिष्ट–१३ | | | |
| **मालमत्ता / गुंतवणूक** | | | |
| पुस्तके | ८८,७२१.०० | -- | ८८,७२१.०० |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| खर्च | गद्रे मंगल कार्यालय रु. | चित्तपावन मंगल कार्यालय रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|
| फर्निचर | ३९,३४५.०० | -- | ३९,३४५.०० |
| प्रोजेक्टर | ४३,९८८.०० | -- | ४३,९८८.०० |
| मुदत ठेव | ४३,००,०००.०० | -- | ४३,००,०००.०० |
| | ४४,७२,०५४.०० | -- | ४४,७२,०५४.०० |
| काका गद्रे | -- | -- | -- |
| चित्तपावन ब्राह्मण संघ | ९६,०५३.०० | ७,०४,७७५.०० | ८,००,८२८.०० |
| **एकूण** | **७०,९८,५०३.६१** | **१७,५६,१८७.४०** | **८८,५४,६९१.०१** |

| श्री.विजय साने | श्री. श्रीरंग वैशंपायन | श्री. अभय खरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| मालमत्तेचे वर्णन | आरंभीची शिल्लक | खरेदी | विक्री (भंगार) | एकूण | घसारा | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| **१) इमारत** | | | | | | |
| गद्रे | ४३,९९,६४४.९४ | ०.०० | ०.०० | ४३,९९,६४४.९४ | २,१९,९८२.२५ | ४१,७९,६६२.६९ |
| चित्तपावन | २१,०८,३१४.९२ | ०.०० | ०.०० | २१,०८,३१४.९२ | २,१०,८३१.४९ | १८,९७,४८३.४३ |
| प्रशासकीय | १,२६,६७४.९३ | ०.०० | ०.०० | १,२६,६७४.९३ | १२,६६७.४९ | १,१४,००७.४४ |
| | ६६,३४,६३४.७९ | ०.०० | ०.०० | ६६,३४,६३४.७९ | ४,४३,४८१.२३ | ६१,९१,१५२.५६ |
| **२)साहित्य संग्रह** | | | | | | |
| गद्रे कार्यालय | १,०६,५१८.४० | ०.०० | ०.०० | १,०६,५१८.४० | १०,६५१.८० | ९५,८६६.६० |
| (+) हरवलेल्या वस्तूचे जमा | | ०.०० | ०.०० | | | |
| चित्तपावन कार्यालय | ३४,९६०.९८ | ०.०० | ०.०० | ३४,९६०.९८ | ३,४९६.०८ | ३१,४६४.९० |
| (+) हरवलेल्या वस्तूचे जमा | | ०.०० | ०.०० | | | |
| | १,४१,४७९.३८ | ०.०० | ०.०० | १,४१,४७९.३८ | १४,१४७.८८ | १,२७,३३१.५० |
| **३) फर्निचर** | | | | | | |
| गद्रे कार्यालय | १,०८,८४१.२४ | ३९,३४५.०० | ०.०० | १,४८,१८६.२४ | १४,८१८.६२ | १,३३,३६७.६२ |
| चित्तपावन कार्यालय | १७,६६९.८३ | ०.०० | ०.०० | १७,६६९.८३ | १,७६६.९४ | १५,९०२.८९ |
| प्रशासकीय कार्यालय | ९३८.२१ | ०.०० | ०.०० | ९३८.२१ | ९३.८१ | ८४४.४० |
| | १,२७,४४९.२८ | ३९,३४५.०० | ०.०० | १,६६,७९४.२८ | १६,६७९.३७ | १,५०,११४.९१ |
| **४) संगणक** | | | | | | |
| चित्तपावन | ७६८.९२ | ०.०० | ०.०० | ७६८.९२ | १९२.२३ | ५७६.६९ |
| प्रशासकीय | ७९८.६७ | ०.०० | ०.०० | ७९८.६७ | १९९.६७ | ५९९.०० |
| गद्रे | ३०,२७२.०६ | ०.०० | ०.०० | ३०,२७२.०६ | ७,५६८.०२ | २२,७०४.०४ |
| | ३१,८३९.६५ | ०.०० | ०.०० | ३१,८३९.६५ | ७,९५९.९२ | २३,८७९.७३ |
| **५) धार्मिक ग्रंथालय** | | | | | | |
| (प्रशासकीय कार्यालय) | ३७,५९३.३६ | ०.०० | ०.०० | ३७,५९३.३६ | ३,७५९.३६ | ३३,८३४.०० |
| | ३७,५९३.३६ | ०.०० | ०.०० | ३७,५९३.३६ | ३,७५९.३६ | ३३,८३४.०० |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

तेरीज पत्रक (कालावधी १/४/२०१३ ते ३१/३/२०१४ करिता)

| मालमत्तेचे वर्णन | आरंभीची शिल्लक | खरेदी | विक्री (भंगार) | एकूण | घसारा | अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| **६) जनरेटर** (गद्रे कार्यालय) | २,९०,३७२.९६ | ०.०० | ०.०० | २,९०,३७२.९६ | २९,०३७.२९ | २,६१,३३५.६७ |
| | २,९०,३७२.९६ | ०.०० | ०.०० | २,९०,३७२.९६ | २९,०३७.२९ | २,६१,३३५.६७ |
| **७) विद्युतीकरण** (गद्रे का.) | ९४,२८६.७५ | ०.०० | ०.०० | ९४,२८६.७५ | १४,१४३.०१ | ८०,१४३.७४ |
| | ९४,२८६.७५ | ०.०० | ०.०० | ९४,२८६.७५ | १४,१४३.०१ | ८०,१४३.७४ |
| **८) लिफ्ट** (गद्रे कार्यालय) | १,१३,११२.३६ | ०.०० | ०.०० | १,१३,११२.३६ | १६,९६६.८५ | ९६,१४५.५१ |
| | १,१३,११२.३६ | ०.०० | ०.०० | १,१३,११२.३६ | १६,९६६.८५ | ९६,१४५.५१ |
| **९) गिझर** (गद्रे कार्यालय) | ६,०३२.३५ | ०.०० | ०.०० | ६,०३२.३५ | ९०४.८५ | ५,१२७.५० |
| | ६,०३२.३५ | ०.०० | ०.०० | ६,०३२.३५ | ९०४.८५ | ५,१२७.५० |
| **१०) विद्युत उपकरण** | ९२०.७५ | ०.०० | ०.०० | ९२०.७५ | १३८.११ | ७८२.६४ |
| (गद्रे कार्यालय) | ९२०.७५ | ०.०० | ०.०० | ९२०.७५ | १३८.११ | ७८२.६४ |
| **११) कार्या. उपकरणे** | १२,१८६.९० | ०.०० | ०.०० | १२,१८६.९० | ६०९.३६ | ११,५७७.५५ |
| (गद्रे कार्यालय) | १२,१८६.९० | ०.०० | ०.०० | १२,१८६.९० | ६०९.३६ | ११,५७७.५५ |
| **१२) ध्वनी उपकरणे** | २५,८४८.१० | ०.०० | ०.०० | २५,८४८.१० | ३,८७७.२२ | २१,९७०.८८ |
| (गद्रे कार्यालय) | २५,८४८.१० | ०.०० | ०.०० | २५,८४८.१० | ३,८७७.२२ | २१,९७०.८८ |
| **१३) वॉटर कुलर्स** (गद्रे का.) | ४३,९४५.०० | ०.०० | ०.०० | ४३,९४५.०० | ६,५९१.७५ | ३७,३५३.२५ |
| | ४३,९४५.०० | ०.०० | ०.०० | ४३,९४५.०० | ६,५९१.७५ | ३७,३५३.२५ |
| **१४) वेब साईट डेव्हलप.** | ३१,७०१.७५ | ०.०० | ०.०० | ३१,७०१.७५ | ४,७५५.२६ | २६,९४६.४९ |
| (गद्रे कार्यालय) | ३१,७०१.७५ | ०.०० | ०.०० | ३१,७०१.७५ | ४,७५५.२६ | २६,९४६.४९ |
| **१५) पुस्तके** (गद्रे कार्या.) | १,०६,२०३.०० | ८८,७२१.०० | ८५,७२१.०० | १,०९,२०३.०० | १०,९२०.०० | ९८,२८३.०० |
| | १,०६,२०३.०० | ८८,७२१.०० | ८५,७२१.०० | १,०९,२०३.०० | १०,९२०.०० | ९८,२८३.०० |
| **१६) प्रोजेक्टर** | ०.०० | ४३,९८८.०० | ०.०० | ४३,९८८.०० | ६,५९८.२० | ३७,३८९.८० |
| | ०.०० | ४३,९८८.०० | ०.०० | ४३,९८८.०० | ६,५९८.२० | ३७,३८९.८० |
| **एकूण** | ७६,९७,६०६.३८ | १,७२,०५४.०० | ८५,७२१.०० | ७७,८३,९३९.३८ | ५,८०,५६९.६६ | ७२,०३,३६९.७२ |

परिशिष्ट २

**डिपॉझिट व ॲडव्हान्सेस**

| तपशील | १-४-२०१३ रोजी मूळ किंमत | चालू वर्षातील वाढ | चालू वर्षातील परत | ३१-३-२०१४ रोजी मूळ किंमत |
|---|---|---|---|---|
| म.रा.वि. मंडळ डिपॉझिट | २६०.०० | १४,७४०.०० | -- | १५,०००.०० |
| चित्तपावन दूरध्वनी डिपॉझिट | ८,४००.०० | -- | ७,६५०.०० | ७५०.०० |
| गद्रे दूरध्वनी डिपॉझिट | ८००.०० | २००.०० | -- | १,०००.०० |
| म.रा.वि. मंडळ निरंजन मठ डिपॉझिट | -- | १२०.०० | -- | १२०.०० |
| म.रा.वि. मंडळ चित्तपावन डिपॉझिट | ७,४०५.०० | -- | ४,८९५.०० | २,५१०.०० |
| पाणी मीटर अनामत (चित्तपावन) | ४,०००.०० | -- | -- | ४,०००.०० |
| गॅस चित्तपावन | ३५०.०० | -- | -- | ३५०.०० |
| **एकूण** | **२१,२१५.००** | **१५,०६०.००** | **१२,५४५.००** | **२३,७३०.००** |

परिशिष्ट ३

**गुंतवणूक**

| तपशील | २-४-२०१३ रोजी मूळ किंमत | चालू वर्षातील वाढ | चालू वर्षातील परत | ३१-३-२०१४ रोजी मूळ किंमत |
|---|---|---|---|---|
| परशुराम नागरी पतपेढी मुदत ठेव | २५,००,०००.०० | ४३,००,०००.०० | २९,००,०००.०० | ३९,००,०००.०० |
| परशुराम नागरी पतपेढी शेअर्स | ५००.०० | — | — | ५००.०० |
| **एकूण** | **२५,००,५००.००** | **४३,००,०००.००** | **२९,००,०००.००** | **३९,००,५००.००** |

परिशिष्ट ५

**निधी**

| | | |
|---|---|---|
| विश्वस्त निधी | | |
| मागील बाकी | २०,३३,९९१.१० | |
| (+) सभासद वर्गणी | २६,०२६.०० | २०,६०,०१७.१० |
| इमारत निधी (चित्तपावन) | | २,५१,०००.०० |
| अमृत महोत्सव देणगी | | ५,९३,०१९.०० |
| **एकूण** | | **२९,०४,०३६.१०** |

परिशिष्ट ४

**येणी व इतर**

| | | |
|---|---|---|
| पगार ॲडव्हान्स | | ३००.०० |
| गिरीश उपासनी | | ७५,०००.०० |
| हिरामण देवरे | | |
| (+) चालू वर्षाचा | ५,०००.०० | |
| (−) चालू वर्षाचा | २,०००.०० | ३,०००.०० |
| चित्तपावन चरित्र कोष | | |
| मागील बाकी | ८,८००.०० | |
| (+) चालू वर्षाचा | -- | |
| (−) चालू वर्षाचा | २,७००.०० | ६,१००.०० |
| मीरा एन्टरप्राईजेस | | |
| (+) चालू वर्षाचा | १,१७,४२४.०० | |
| (−) चालू वर्षाचा | १,१५,३७६.०० | २,०४८.०० |
| **एकूण** | | **८६,४४८.००** |

परिशिष्ट ६

**अनामत**

| | | |
|---|---|---|
| **कार्यालय अनामत (चित्तपावन)** | | |
| मागील बाकी | ५,०००.०० | |
| (+) चालू वर्षात जमा | | |
| (−) चालू वर्षात नावे | | ५,०००.०० |
| **कार्यालय अनामत (गद्रे)** | | |
| मागील बाकी | ३,२१,१००.०० | |
| (+) चालू वर्षात जमा | ७७,३२६.०० | |
| (−) चालू वर्षात नावे | १,३२,३२६.०० | २,६६,१००.०० |
| अनामत टी आय एम ई | | ५०,०००.०० |
| **कंत्राटदाराकडून सुरक्षा ठेव (चित्तपावन)** | | १,०३,८९३.७४ |
| परशुराम भवन अनामत | | ३,०००.०० |
| सुरक्षा ठेव | | २५,५००.०० |
| **एकूण** | | **४,५३,४९३.७४** |

परिशिष्ट ७

**इतर**

| | | |
|---|---|---|
| **सेवा कर** | | |
| मागील बाकी | १०,८८२.०० | |
| (+) चित्तपावन कार्यालय | २,५३,०४०.०० | |
| (+) गद्रे कार्यालय | -- | |
| (−) नावे गद्रे कार्यालय | २,४१,३२४.०० | |
| (−) नावे चित्तपावन कार्यालय | -- | २२,५९८.०० |
| टीडीएस देणे | | |
| (−) जमा | ६,०८५.०० | |
| (−) नावे | ४,०३७.०० | २,०४८.०० |
| पुस्तक अनामत (चित्तपावन) मागील बाकी | | १,१२५.०० |
| आगाऊ रक्कम (परशुराम विक्री) | | ४४,००,०००.०० |
| चित्तपावन महासंघ | | १०,८७१.५० |
| कर्ज | | |
| अदिती जोशी | १,००,०००.०० | |
| अ अभ्यंकर | ५०,०००.०० | |
| भालचंद्र कर्वे (एच यु एफ) | ५०,०००.०० | |
| देवदत्त जोशी | १,००,०००.०० | |
| देवेंद्र बापट | ५०,०००.०० | |
| जगदीश फडके | २५,०००.०० | |
| जयवंत जोगळेकर | १,००,०००.०० | |
| केतन पटवर्धन | ५०,०००.०० | |
| मैथिली गोखले | ५०,०००.०० | |
| नितीन सहस्त्रबुद्धे | ५०,०००.०० | |
| प्रभाकर केळकर | १,००,०००.०० | |
| श्रीकृष्ण विद्वांस | १,००,०००.०० | |
| वसंत दातार | ५०,०००.०० | |
| यशवंत केळकर | १,००,०००.०० | ९,७५,०००.०० |
| **एकूण** | | **५४,११,६४२.५०** |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## अंदाजपत्रक २०१५-२०१६

| तपशिलजमा | अंदाजे जमा २०१४-२०१५ रुपये | प्रत्यक्ष जमा डिसें. १४ (अनऑडिटेड) रुपये | अंदाजे जमा २०१५-२०१६ रुपये |
|---|---|---|---|
| देणगी - सर्व प्रकारच्या | १०,००,००० | ४,३९,५५० | १०,००,००० |
| सभासद वर्गणी | ५०,००० | १९,०१९ | २५,००० |
| शैक्षणिक निधी - वह्या पुस्तके | २५,००० | ६१,१०७ | ७५,००० |
| वधुवर सूचक वर्गणी | २५,००० | १९,६०० | २५,००० |
| उत्सव इत्यादी जमा | २,००,००० | ५८,५९७ | १,५०,००० |
| जाहिरात | २५,००० | १,३१,२५० | २,००,००० |
| व्याज खाते | -- | २,१०,७७१ | १,५०,००० |
| साहित्य सुविधा | -- | -- | -- |
| वीज आकार | -- | -- | -- |
| सेवा कर इत्यादी | -- | -- | -- |
| इतर जमा - जागा भाडे व किरकोळ | ३,४०,००० | २,२१,६५२ | ३,५०,००० |
| उद्योजक मंच | ३,००,००० | २,८७,१०२ | ४,००,००० |
| परशुराम भवन रक्कम-ठेवी-परत | ३५,००,००० | ४१,००,००० | १०,००,००० |
| सभासदांकडून ठेवी जमा (बिनव्याजी) | २७,७०,००० | ५,००,००० | -- |
| **एकूण** | **९७,३५,०००** | **६५,९८,६४८** | **४८,७५,०००** |

| **श्री.विजय साने** | **श्री. श्रीरंग वैशंपायन** | **श्री. अभय खरे** |
|---|---|---|
| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## अंदाजपत्रक २०१५-२०१६

| तपशिलखर्च | अंदाजे खर्च २०१४-२०१५ रुपये | प्रत्यक्ष खर्च डिसें. १४ (अनऑडिटेड) रुपये | अंदाजे खर्च २०१५-२०१६ रुपये |
|---|---|---|---|
| देणगी | -- | ३१,००० | २५,००० |
| आर्थिक मदत | १,५०,००० | ६१,३०० | १,५०,००० |
| वैद्यकीय मदत | २,००,००० | ४०,००० | १,५०,००० |
| शैक्षणिक मदत (वह्या+पुस्तके+रोख) | ३,००,००० | १,४९,४४६ | ५,००,००० |
| धर्मदाय अंशदान | ५०,००० | -- | -- |
| उत्सव सत्कार समारंभ | ५,००,००० | ४,३३,८७५ | ५,००,००० |
| चित्तपावन मित्र - मासिक छपाई | २,५०,००० | ६१,२२२ | २,००,००० |
| नूतनीकरण | -- | -- | ५,००,००० |
| म.न.पा. कर | २,५०,००० | १,५०,७४२ | २,२५,००० |
| दुरुस्ती देखभाल | १,००,००० | ४,८१५ | १,००,००० |
| साहित्य दुरुस्ती | -- | -- | १,००,००० |
| लिफ्ट मेंटेनन्स | -- | -- | १,५०,००० |
| सेवा कर | -- | ८२,५९० | २,००,००० |
| जनरेटर-मेंटेनन्स | -- | -- | २०,००० |
| विमा | २५,००० | ६,८४९ | २५,००० |
| पगार मानधन | १,५०,००० | ७९,१६७ | १,५०,००० |
| पाणी सुविधा | २५,००० | -- | २५,००० |
| वीज आकार | २५,००० | -- | २५,००० |
| साफसफाई धुलाई | -- | ३,६४२ | १५,००० |
| जाहिरात | -- | ४,३९० | १५,००० |
| छपाई-स्टेशनरी | १०,००० | २३,९७१ | २५,००० |
| किरकोळ खर्च | १०,००० | १३,४९२ | १५,००० |
| टेलिफोन खर्च | १०,००० | ३,४४० | १०,००० |
| ऑडिट फी | २०,००० | -- | १५,००० |
| टपाल खर्च | २५,००० | ११,४६८ | २५,००० |
| सभा खर्च | २५,००० | २०,५०२ | २५,००० |
| व्यवसाय कर | ५,००० | -- | ५,००० |
| वेब साईट | १०,००० | १६,४५० | २५,००० |
| कायदेशीर सल्ला मसलत | २५,००० | -- | २५,००० |
| सर्व्हे फी | -- | -- | -- |
| उद्योजक मंच | ३,५०,००० | -- | ३,५०,००० |
| परशुराम भवन - रक्कम परत | ४४,००,००० | ४४,००,००० | -- |
| परशुराम भवन - व्याज | २८,००,००० | -- | -- |
| शिल्लक बँक कॅश | २०,००० | १०,००,२८७ | ७,८०,००० |
| **एकूण** | **९७,३५,०००** | **६५,९८,६४८** | **४८,७५,०००** |

| **श्री.विजय साने** | **श्री. श्रीरंग वैशंपायन** | **श्री. अभय खरे** |
|---|---|---|
| अध्यक्ष | कोषाध्यक्ष | कार्यवाह |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १३५ | प्रसन्न अरुण लोंढे<br>वुडलॅण्ड को-ऑप.हौ. सोसायटी, बिल्डिंग नं. ८, फ्लॅट नं. २१,<br>गांधी भवनजवळ कोथरुड, पुणे. मो. ९६७३४७५६०५ | २३-११-८१ | गार्ग्य | ५.८ | बी.सी.एस. | ३-४ लाख<br>(वार्षिक) |
| १३६ | कौस्तुभ अशोक गोखले<br>प्लॉट नं. ८, दि संयुक्त महाराष्ट्र हौ. सोसा., नवी वसाहत,<br>राजरामपुरी - कोल्हापूर - ४१६००८.<br>फोन : ०२३१-२५२७७७१, मो. ९४०५७४४७७१ | ९-७-८४ | काश्यप | ५.८ | एम.कॉम.,<br>जी.डी.सी.ए. | २५-३००००<br>(मासिक) |
| १३७ | सुधीर धनंजय दाते<br>मु. पो. नातेपुते, ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०१.<br>फोन : २१८५-२६२३२१, मो. ९८६०४२२५८१ | २८-१-७५ | वशिष्ठ | ५.११ | बी.ए., एम.बी.ए. | ५०,०००<br>(मासिक) |
| १३८ | कौस्तुभ दिलीप लेले<br>बी-७, खैरेकर सी.एच.एस.-१०९, ब्राह्मण आळी, भिवंडी,<br>जि. ठाणे - ४२१३०८, फोन : ०२५२२-२२७७६४<br>मो. ९६३७९८१३१३ | १४-१२-८५ | काश्यप | ५.५ | पदवीधर (आर्टस्) | ३१,०००<br>(मासिक) |
| १३९ | भूषण देविदास कुलकर्णी<br>११, सुभाषिणी सोसा., कौसल्यानगर, रामवाडी, पंचवटी, नाशिक-३<br>फोन : ०२५३-२५१२२८६, मो. ९८८१०६६५८८ | १२-१-८३ | वशिष्ठ | ५.६ | एम.कॉम. | १२,०००<br>(मासिक) |
| १४० | दिपेश किरण जोशी<br>सी-१, व्हिनस आर्केड, घरौंदा अपा. जवळ, शिवाजीनगर,<br>जेलरोड, नाशिकरोड. मो. ९०४९१८१५०० | १६-३-८३ | शांडिल्य | ५.४ | एम.कॉम, एम.बी.ए. | २५,०००<br>(मासिक) |
| १४१ | स्वप्नील जयंत वझे<br>न्हावी गल्ली, कापडबाजार, मु.पो.ता. कोपरगाव, जि. नगर ४२३६०१.<br>फोन : २४२३-२२४५२३, मो. ८७९३५११२३८ | २८-१२-८८ | गार्ग्य | ५.४ | बी.ई. (कॉम्प्युटर) | ७ लाख<br>(वार्षिक) |
| १४२ | निखिल सतीश नेने<br>'नेनेफार्म' इरिगेशन रेस्ट हाऊस जवळ, मु.पो. पढेगांव,<br>ता. कोपरगाव, जि. नगर. मो. ९२०९९०९८३२, ९२२६७५२४६९ | २१-६-८७ | विष्णुवृद्ध | ५.८ | एम.एस्सी (स्टॅटी.) | ७०,०००<br>(मासिक) |
| १४३ | निलेश अशोक कुंटे<br>फ्लॅट नं. ५, साईव्हिला अपा., वासननगर, पाथर्डी फाटा, नाशिक<br>मो. ९५२७७०२९५७ | १९-३-८२ | जमदग्नी | ५.६ | एम.ए., बी.एड.<br>(नाममात्र घटस्फोटित) | १६,०००<br>(मासिक) |
| १४४ | केतन शिरीष गोखले<br>१००४/२ब २/ए वॉर्ड, न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर - ४१६०१२.<br>फोन : ०२३१-२६२६९०३, मो. ९६२३१५११२६ | २-७-८८ | काश्यप | ५.९ | बी.कॉम., एलएल.बी. | ३०-३५०००<br>(मासिक) |
| १४५ | मंगेश प्रल्हाद रानडे<br>एन ४२, जे.सी.-३-१०/१५, रायगड चौक, सिडको, नाशिक-८.<br>मो. ९४२३९२५४६८ | १-८-९२ | भारद्वाज | ५.६ | १२ वी, आयटीआय,<br>एमएस-सीआयटी | १५,०००<br>(मासिक) |

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १४६ | विवेक अनंत आठवले<br>'रायगड' बंगला, शास्त्रीनगर, उंबरखेड रोड, पिंपळगाव (ब), नाशिक<br>मो. ९९६०२८१८६१, ९८९०९१२२०२ | २६–५–७३ | अत्री | ५.१ | एम.कॉम.<br>(नाममात्र घटस्फोटित) | १०,०००<br>(मासिक) |
| १४७ | गौरव रामतनय गोन्हे<br>३३, प्रियांका पार्क, तिडकेनगर, नाशिक–८. मो. ९९२२४४४४६२ | ४–१०–८४ | मुद्गल | ५.८ | बी.ई.,एम.टेक. | ७२०००<br>(मासिक) |
| १४८ | चंद्रशेखर प्रभाकर गोरे<br>घ.नं. ४६, घोट्या गुरुद्वाराजवळ, सावरकरनगर, मनमाड,<br>जि. नाशिक ४२३१०४. मो. ९५२७५७५३३८ | २३–५–७१ | वत्स | ५.५ | बी.ए.<br>(घटस्फोटित) | २०,०००<br>(मासिक) |
| १४९ | कुणाल श्रीकांत गद्रे<br>२३, ब्रम्हचैतन्य, विसे मळा, कॉलेजरोड, नाशिक–५.<br>फोन : ०२५३–२५७१३१३, मो. ७५८८७००९९० | ७–१२–८७ | कौशिक | ५.९ | बी.कॉम,<br>एम.बी.ए. (फाय.) | २०,०००<br>(मासिक) |
| १५० | डॉ. श्रीनिवास श्रीधर गोसावी<br>७७४, गोसावी वाडा, रविवार पेठ, नाशिक–१.<br>फोन : ०२५३–२५०८८१४, मो. ९८९०४५८११४ | ३१–१०–८४ | काश्यप | ५.५ | बी.डी.एस. | ४०,०००<br>(मासिक) |
| १५१ | प्रणित मुकुंद घाटे<br>१०, जयप्रकाश हौ. सो., पुरुषोत्तम हायस्कूल मागे, विद्यानगरी,<br>दत्तमंदिर, मोटवाणीरोड, नाशिकरोड. मो. ९४२१४१२५३१ | २२–४–८६ | कौशिक | ६.०० | बीएफए.<br>ए.टी.डी. | ३०,०००<br>(मासिक) |
| १५२ | अनिकेत अशोक मराठे<br>बंगला नं. ८, स्वामी विवेकानंद सोसा., लॅम रोड, देवळाली कॅम्प.<br>मो. ९३७१९३७१३९ | १–११–८४ | कपी | ५.५ | एम.बी.ए. | ३५,०००<br>(मासिक) |
| १५३ | दिपक परशुराम गोखले<br>एन९/जी१/१/१ सिद्धेश्वर मार्ग, गिरीजाप्रसाद, नवीन नाशिक–९.<br>मो. ९४०३०३८९०२, ९८९०२२८०२९ | ४–७–७८ | काश्यप | ५.१० | बी.कॉम. | ४०,०००<br>(मासिक) |
| १५४ | निलेश भास्कर करंदीकर<br>प्लॉट नं. ९३, ३, दैनिका रेसिडेंसी, बाजीराव आव्हाड चौक,<br>कृष्ण मंदिराजवळ, चेतनानगर, नाशिक–९. | २०–३–८७ | कपी | ५.७ | १० वी | ७०००<br>(मासिक) |

## सामुदायिक व्रतबंध

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेतर्फे सामुदायिक व्रतबंध शुक्रवार दि. ८ मे २०१५ रोजी वैशाख कृ. ४ शके १९३७ सकाळी १०.५० वा. आयोजित करण्यात येत आहे. व्रतबंध सोहळा संस्थेच्या चित्तपावन मंगल कार्यालयात उमामहेश्वर लेन, एकमुखी दत्तमंदिरासमोर, नाशिक–१ या ठिकाणी होईल. अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संस्थेच्या 'काका गद्रे मंगल कार्यालय' गोळे कॉलनी, नाशिक याठिकाणी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**वेळ : सकाळी १० ते १ व दुपारी ४ ते ८**

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ६६ | कल्याणी हेमंत ओक<br>प्लॉट नं. ९, द.पू. रेल्वे कॉलनी-२, पार्थ अपार्टमेंट, दुसरा मजला, प्रतापनगर, नागपूर-४४००२२.<br>फोन : ०७१२-२२९४७१०, मो. ९४२२४७७३८० | २३-३-९१ | वशिष्ठ | ५.३ | बी.एस्सी. | -- |
| ६७ | रश्मी मुकुंद घाटे<br>१०, जयप्रकाश हौ. सो., पुरुषोत्तम हायस्कूल समोर, विद्यानगरी, जेलरोड, नाशिकरोड-४२२१०१. मो. ९४२१४१२५३१ | २०-१-९१ | कौशिक | ५.७ | बी.कॉम, डी.बी.एम. | १०,००० (मासिक) |
| ६८ | प्राजक्ता प्रवीण काळे<br>बाळकृष्ण सोसायटी, ३१, कृष्ण कमळ बिल्डिंग, शिवाजीनगर, बी कॅबीन रोड, नौपाडा-ठाणे (प) ४०० ६०२.<br>मो. ९३२३५६५३६४, ९९३०१५२७३७ | १-६-८२ | वत्स | ५.३ | बी.कॉम, एलएल.बी. डीएचआरएम | -- |

# कै. काकासाहेब गद्रे पुण्यतिथी निमित्त हरिपाठ व किर्तन


संत निवृत्तीनाथ महाराज जयंतीसाठी त्र्यंबक येथे जाणाऱ्या दिंडीचे आगमन दरवर्षीप्रमाणे मंगळवार दिनांक १३ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी ६ वाजता संस्थेच्या काका गद्रे मंगल कार्यालयात होणार आहे. त्यानिमित्त परंपरेनुसार कै. काकासाहेब गद्रे पुण्यतिथी निमित्त हरिपाठ व किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

**हरिपाठ** : सायं. ७ ते ८ **हरिकिर्तन** : रात्री ९ ते १२

**दिंडी प्रमुख** : श्रीमती कामतबाई **किर्तनकार** : श्री. ह.भ.प. बाळासाहेब महाराज वाक्चौरे
श्री. ह.भ.प. उत्तम महाराज गायकवाड

तरी सर्व सभासदांनी हरिपाठ, किर्तन तसेच प्रसादाचा लाभ घ्यावा हि विनंती.

## अभिनंदन



आपल्या संस्थेच्या आजीव सदस्या सौ. कविता जयंत खाडिलकर यांचे चिरंजीव **रोहन जयंत खाडिलकर** यांनी जीवनशास्त्रातील पीएच.डी. पदवी दि. २ डिसेंबर २०१४ रोजी जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगलुरु येथून मिळविली. त्यांचा पीएच.डी. चा विषय ''Blood stem cell Maintenance and Leukemia development'' असा होता. ते आता Post-doc साठी जानेवारी २०१५ मध्ये University of British Columbia, Vancouver Canada, येथे रवाना होत आहे. जिथे ते Germline stem cells वर रिसर्च करणार आहेत.

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

मिहिर कन्स्ट्रक्शन

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेक्शा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक. फोन : २५९०७५४
**ईमेल** : cvranade@gmail.com

**सी. व्ही. रानडे**, बी.ई. (सिव्हिल)
**मोबाईल** : ०९४२२२४६८७८

## ज्येष्ठ नागरिक मंच - सभा

दि. २५-१२-२०१४ रोजी श्री परशुराम चित्तपावन ज्येष्ठ नागरिक मंचची सभा दुपारी ठीक ४.३० वा. संपन्न झाली. यावेळी श्री. विनायकराव साने गुरुजी यांनी १६ संस्कारांची प्राथमिक माहिती दिली व त्यानंतर प्रश्नोत्तराच्या स्वरुपात चर्चात्मक कार्यक्रम संपन्न झाला. श्री. साने गुरुजी व श्री. सुनील जोशी गुरुजी यांचा यथोचित सत्कार करणेत आला.

मंचाची जानेवारी महिन्याच्या चवथ्या गुरुवारी दि. २२-१-२०१५ रोजी दु. ४.३० वा. गद्रे मंगल कार्यालयात सुरू होईल. कृपया ज्येष्ठ नागरिक पुरुष ५५ च्या वर व महिला ५० च्या वर असतील त्यांनी आवर्जून उपस्थिथ रहावे ही नम्र विनंती. सभा वेळेवर सुरू होते. संपर्क ०२५३-२५७३६९२, मो. ९४०३५५६४६४ शी साधावा.

## धुंधुर्मास कार्यक्रम

संस्थेतर्फे साजरा होणारा धुंधुर्मास कार्यक्रम दि. २६ जानेवारी २०१५ रोजी सकाळी १० वाजता नभांगण लॉन्स, गजानन महाराज मंदिरासमोर वनवैभव, वडाळा-पाथर्डी रोड, इंदिरानगर, नाशिक येथे संपन्न होणार आहे. भोजनासाठी प्रौढांसाठी शुल्क रु. ८०/- व लहान मुलांसाठी (१२ वर्षाखालील) रु. ४०/- आहे. कार्यक्रम फक्त सभासद व त्यांच्या कुटुंबियांसाठीच आहे. भोजन प्रवेशिका संस्थेच्या गद्रे मंगल कार्यालयात **२३ जानेवारी २०१५ पर्यंतच मिळतील.**

विशेष सूचना - ऐनवेळी प्रवेश दिल्यास कार्यक्रमाचा गोंधळ होतो हे लक्षात घेऊन कृपया आपल्या प्रवेशिका वेळेवर घेऊन जाव्यात.

**ऐनवेळी प्रवेशिका मिळणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

THE PREDICTION

*School of Vedic Astrology*

**फलज्योतिष शास्त्राचे**

**● मार्गदर्शन ● शिक्षण ● प्रबोधन**

**डॉ. सतिश किबे** (मार्गदर्शक) **श्री. संतोष देवधर** (अध्यक्ष) **श्री. किरण देशपांडे** (संस्थापक)

४८०, विश्वा पॉईंट, राधा निवास, गोळे कॉलनी, नासिक-२. फोन : ९४२१५०७५८३

**सभासदांना १०% सुट जानेवारी मध्ये वर्ग सुरू.**

**आश्रय प्रतिष्ठान सेवा केंद्र**

**केअर ॲण्ड रिहॅबिलीटेशन सेंटर**

✻ ज्या वृद्ध आजी-आजोबांना सांभाळण्यास कोणीही नाही त्यांच्यासाठी व अंथरुणाला खिळलेले रुग्ण आणि व्यायामाची गरज असलेल्या रुग्णांसाठी सर्व अत्याधुनिक सोयींनी परिपूर्ण अशी राहण्याची सोय.
✻ रुग्णांची अतिशय घरगुती पद्धतीने काळजीपूर्वक देखभाल.

**श्री. संजय करमाळकर**
मो. ९६५७२०४६५७, ७५८८१५४२६२

**श्री. चंद्रशेखर कुलकर्णी**
मो. ९०२१५८६७०८, ९३७१६७३२४८

॥ उद्यमेन हि सिध्यन्ति ॥

# श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिक

काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक – ४२२ ००२.
दूरध्वनी : ०२५३–२३१३७०९

## ठेवीवरील व्याजदर तक्ता – २८/८/२०१४ पासून

| | | व्याजाचा दर | प्रकार |
|---|---|---|---|
| ● बचत खाते | – | ४.०० % | ६ महिने |
| ● ३० दिवस ते १८० दिवस | – | ७.०० % | सरळ व्याज |
| ● १८१ दिवस ते १२ महिने | – | ९.०० % | सरळ व्याज |
| ● १३ महिने ते २४ महिने | – | १०.०० % | चक्रवाढ व्याज |
| ● २५ महिने ते ३६ महिने | – | १०.५० % | चक्रवाढ व्याज |
| ● ३७ महिने ते ९५ महिने | – | ९.०० % | चक्रवाढ व्याज |
| ● दामदुप्पट योजना ९६ महिने | | | |

१३ महिने व त्यावरील मुदतीस ०.५०% जादा व्याज ज्येष्ठ नागरिकांकरीता

**● विशेष ठेव योजना : १२ महिन्यांसाठी ११.००% सरळव्याज सर्व वयोगटासाठी ●**

## ● भावपूर्ण श्रद्धांजली ●



आपल्या संस्थेचे सभासद **प्रशांत चंद्रशेखर घैसास** यांचे वयाच्या ४८ व्या वर्षी अल्पशा आजाराने सोमवार दि. २९–१२–२०१४ रोजी दुःखद निधन झाले.

त्र्यंबकेश्वर येथील श्री परशुराम मंदीर संस्था व आपली संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्री योगेश्वरी मंदीर व इतर सामाजिक उपक्रम सुरू करण्याच्या प्रयत्नात त्यांनी विशेष सहभाग व योगदान दिले होते. श्री परशुराम मंदीराच्या जीर्णोद्धारामध्ये देखील त्यांनी बहुमुल्य कामगिरी बजावली होती. घैसास कुटुंबियांच्या दुःखात संस्था सहभागी आहे.

# चित्तपावन उद्योग मंच

चित्तपावन उद्योग मंचाची डिसेंबर महिन्याची सभा चौथ्या रविवारी कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सभागृहात झाली. नेहमीच्या ठिकाणी सभा नसूनही उद्योजकांची उपस्थिती चांगली होती. या सभेसाठी के.एस.बी. पंप्स चे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. सुनील बापट आणि एच.ए.एल. चे ॲडिशनल जनरल मॅनेजर रिटायर्ड ग्रुप कॅप्टन श्री. देवधर आणि डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. सुभाष घारपुरे उपस्थित होते. श्री. बापट यांनी आपल्या कंपनीविषयी थोडक्यात माहिती दिली व उद्योग संधी काय असू शकतात या विषयी मार्गदर्शन केले. चित्तपावन उद्योजक मंचाची गेल्या सहा वर्षातील वाटचाल माहिती झाल्याने श्री. देवधर आणि श्री. घारपुरे या सभेस आवर्जून उपस्थित होते. उद्योजकांनी एकमेकांच्या सहकार्याने अशीच वाटचाल चालू ठेवावी याबद्दल त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. दर महिन्यात होणाऱ्या सभेस जास्तीत जास्त उद्योजकांनी उपस्थित राहण्याचा प्रयत्न नेहमीच करावा ज्या योगे अशा मान्यवरांच्या भेटीगाठी होऊ शकतात. आपल्या व्यवसाय वाढीसाठी अशा नेटवर्कची गरज असते व यातून व्यवसायवृद्धी साध्य करणे सहज सोपे होते.

# महिला मंडळ

स्नेहबंध मैत्रिणींचा महिला मंडळाचा मासिक कार्यक्रम २७/१२/२०१४ रोजी संपन्न झाला. श्रीमती शैला लवेकर यांनी 'रेकी' या विषयावर उत्तम मार्गदर्शन केले. रेकी देणे व रेकी घेणे याविषयीची विविधता व स्वतःचे बरेच अनुभव कथन केले. कार्यक्रम छान हसत खेळत पार पडला. उपस्थित दोन भगिनींवर रेकीची दोन प्रात्यक्षिके करून दाखविली. यावेळी माधवी जोगळेकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. वासंती फाळके यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. अमृता वाड यांनी कार्यक्रमाच्या आयोजनास मदत केली. उपस्थित भगिनींचे रेकीबद्दलचे शंका समाधान प्रमुख पाहुण्यांनी केले.

दि. २३/१/२०१५ शुक्रवार रोजी संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत आपला ''स्नेहबंध मैत्रिणींचा'' महिला मंडळाचा संक्रांतीच्या हळदी कुंकवाचा कार्यक्रम होणार आहे. त्या वेळेतच उपस्थित भगिनींसाठी स्पर्धा ठेवण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त भगिनींनी मोठ्या संख्येने मैत्रिणींसह, मुली, सुनांसह हजर राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. आपल्या महिला मंडळाचा प्रत्येक कार्यक्रम यापुढे ''गद्रे मंगल कार्यालयाच्या'' तिसऱ्या मजल्यावरच होणार आहे. याची कृपया भगिनींनी नोंद घ्यावी ही विनंती.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा. दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक-२ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळेकॉलनी, नाशिक - ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**फोन - चित्तपावन : २५०११०७, गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**

प्रति, ____________________

____________________

____________________

**संस्थेची वेबसाईट :-**
- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http:\\twitter.com\nasikchitpavan
- http:\\facebook.com\nasikchitpavan
- http:\\youtube.com\user\nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. चित्तपावन मित्र च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.